खे.ता.शि.प्र.मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## वाणिज्य मंडळ (Commerce Association)

## २०२१-२२ / सत्र १

## अहवाल

दिनांक :- २८/०२/२०२२

शैक्षणिक वर्ष 2021 22 च्या प्रथम सत्रातील वाणिज्य मंडळाचे कामकाज पुढील पद्धतीने यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

वाणिज्य शाखेमध्ये प्रथम वर्ष वर्गामध्ये 264 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. तसेच द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 216 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे आणि तृतीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 107 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.

महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत पुढील काही उपक्रम घेण्यात आले.

1 डिसेंबर ते 10 डिसेंबर 2021 या दरम्यान विद्यार्थ्यांना आर्थिक क्षेत्रातील करिअरच्या संधी यावर ऑनलाईन 10 दिवसीय वेबिनार आयोजित करण्यात आले होते. हे वेबिनार झूम च्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सी.ए. अशोक बच्चे (चार्टर्ड अकाउंटंट, सेबी सेक्युरिटी मार्केट ट्रेनर) हे होते.

सदर कार्यक्रमांमध्ये 113 विद्यार्थी आणि 3 प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांची क्विझ एक्झाम घेण्यात आली आणि पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या ईमेल आयडी वर प्रमाणपत्र देण्यात आले. सदर कार्यक्रम, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक वृंद यांच्या सहकार्याने व्यवस्थित पार पाडला.

27 डिसेंबर 2019 रोजी विद्यार्थ्यांना ग्राहक शिक्षण आणि ग्राहक संरक्षण कायदा आणि ग्राहक जागृती बद्दल माहिती व्हावी यासाठी ग्राहक संरक्षण दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये वाणिज्य विभागाचे 120 विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माननीय श्री. रमेश जी टाकळकर (महसूल समिती प्रमुख, अखिल भारतीय ग्राहक पंचायत मध्य महाराष्ट्र प्रांत) हे होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्रतापराव (नानासाहेब) टाकळकर (उपाध्यक्ष खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरुनगर) यांनी स्वीकारले होते. तसेच या कार्यक्रमासाठी ईतर पाहूणे मा. संजयजी शिंदे (महसूल, नायब तहसीलदार खेड तालुका) होते.

मा. श्री. रमेश जी टाकळकर यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. त्यांनी ग्राहकाचे हक्क अधिकार ग्राहक संरक्षण कायदा ग्राहक न्यायालये तसेच ग्राहक संरक्षण अधिनियम त्याचप्रमाणे ग्राहक संरक्षण कायद्यातील बदल, ग्राहकांनी आपल्या हक्कांच्या अधिकारांचा वापर कसा करावा याविषयी विशेष मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे योग्य असे निरसन केले.

सदर शैक्षणिक वर्षातील या सत्रामध्ये प्रत्यक्ष अध्यापन हे खूप कमी स्वरूपामध्ये झाले असल्यामुळे एवढेच उपक्रम राबविण्यात आले.

यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाबद्दल विशेष ज्ञान मिळावे यासाठी विद्यार्थ्यांच्या विषयानुसार क्षेत्रभेट आयोजित करण्यात येतील.

वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत वरील सर्व उपक्रम हे महाविद्यालयाचे प्राचार्य आणि वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडले.

प्रा.अभिजीत बेंडाले
वाणिज्य मंडळ प्रमुख

Recd
28/2/2022